# राशिभविष्य - जुलै, २०२०.

दादा दामले (dadadamle@ gmail.com)

==========================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार, अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही प्रयत्न करून पाहावा व आपणांस तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे, ही विनंती.**

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर, लहरी असाच राहणार आहे. त्यामुळे कोणी चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या तर तो अपमान वाटून असह्य संताप येत असला पाहिजे. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड, खोडकर झाली असण्याची शक्यता दिसते. असे असले तरी या राशीच्या प्रथम स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. तसेच धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या स्वराशीतील बुधामुळे व राहूमुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. शिवाय राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला रवि ग्रह प्रतिकुल असून त्याच्यामुळे अनारोग्याचा त्रास, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता, हाती घेतलेल्या कामात दिरंगाई होणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या भाग्यस्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु ग्रह केतुसह आहे. या केतूमुळे फसवे, ढोंगी, धूर्त आचरण होणे संभवते. जपा. शिवाय या केतूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो वक्री

असल्यामुळे येणाऱ्या अनुकुल संधींचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रवासाचे योग येतील; पण त्यात अडचणी, त्रास सहन करावा लागेलसे दिसते. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती व मन:शांती प्राप्त होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेला शनि ग्रह कोळसा, लोखंडी सामान यांचा व्यापार असणारांना अनुकुल होईल. पण इतर व्यापार-व्यवसाय असणारांना प्रतिकुल व मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. पण मंगळामुळे मैत्रीत वितुष्ट येण्याची शक्यता दिसते. तसेच अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट-परिश्रम करावे लागतील. पण काही भाग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. येथील नेपच्यूनही प्रतिकुल असून त्याच्यामुळे कुमार्गी मंडळींचा त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी झाल्यावर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र अश्विनी असणारांनी “ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः: “ मंत्राचा, भरणी जन्मनक्षत्र असणारांनी ओम यमाय नमः:” मंत्राचा आणि कृत्तिका जन्मनक्षत्र असणारांनी “ ओम अग्नये नमः: “ मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत शुक्र ग्रह असल्यामुळे या राशीच्या मंडळींना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल; पण धनस्थानी असलेल्या रवि -बुध -राहूमुळे मनस्ताप व कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. पण बुधामुळे अर्थलाभ होऊ शकेल. येथील रविमुळे आर्थिक चिंता व नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत वक्री गुरु व केतु असून येथील केतू वैवाहिक व कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच तो अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे काही मंडळींना मुखदंत विकाराचा, तर काहींना त्वचारोगाचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना रक्तविकाराचा आजार होणेही संभवते. शिवाय त्याच्यापासून अपघातभय असल्यामुळे सतत सावधानतेने
आचरण करा. पण गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे प्रवासयोग येण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून हा नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. मंगळ ग्रह औषध विक्रेते व यांत्रिकतांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. इतरांच्या नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्ययस्थानी असलेला हर्षल सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, जिवावरचे प्रसंग, बेअब्रूचे प्रसंग निर्माण करतो. जपा.
श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनशांती देईल. दररोज स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा" चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा" चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना कृत्तिका जन्मनक्षत्र असणारांनी " ओम अग्नये नमः:" मंत्राचा, रोहिणी जन्मनक्षत्र असणारांनी "ओम ब्रह्माय नमः: " मंत्राचा तर मृग जन्मनक्षत्र असणारांनी " ओम सोम सोमाय नमः:" मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेले रवि -बुध -राहू हे तिन्ही ग्रह प्रतिकुल होणार असून रवि ग्रहामुळे आर्थिक चिंता, अनारोग्य, मनस्ताप, वाद, भांडणे अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. काही मंडळींना नेत्रविकार, रक्तविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना थकावट जाणवेल. बुधामुळे काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. त्यामुळे चित्तवृत्ती चंचल होऊन धननाश होणे संभवते. राहूमुळे सतत अपमान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनात सूडभावना निर्माण होईल. शिवाय काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी केतु व वक्री गुरु ग्रह असून केतुमुळे मनस्थिती अस्थिर, अस्वस्थ राहील. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे
स्नेहसंबंधात व प्रेमसंबंधात बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. काही मंडळींना प्रवासयोग येईल, तर काहींना अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या

अष्टम स्थानी मकर राशीत असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे, अनारोग्य होणे अशापैकी मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी नेपच्यून व मंगळ हे दोन ग्रह असून मंगळ ग्रहामुळे काही मंडळींना प्रवासयोग येईल. पण प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. नेपच्यून ग्रह अध्यात्मात रुची असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. काहींना परदेशगमनाचा योग येईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षलमुळे सर्वच बाबतीत अनिश्चितता
निर्माण होईल. मित्रांशी भांडणे होतील. पण काही भाग्यवंतांना धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीगणेश अथर्वशीर्षा" चे पठण करा. तसेच " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा" चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र मृग असणारांनी "ओम सोम सोमाय नमः:" मंत्राचा,
आर्द्रा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम शंकराय नमः:" मंत्राचा तर जन्मनक्षत्र पुनर्वसू असणारांनी "ओम आदितीये नमः: " मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या व्यय स्थानी मिथुन राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून येथील रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी जात आहे. रवि -बुध हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून सतत अपयश, मानहानी , पराजय, आर्थिक चिंता, अनारोग्य अशापैकी कारणांनी मनस्थिती अस्वस्थ राहील व नैराश्य येईल. पण अशा परिस्थितीतही व्ययस्थानी असलेला राहू अनुकुल होईल व काही मंडळींना धनलाभ होईल, तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. हितशत्रूंपासून रक्षण होईल. पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला वक्री गुरु आणि केतू हे दोन्ही ग्रह अनुकुल असून त्यांच्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राहील व काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी स्वतः:च्या मकर राशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे असमाधानकारतक घटना घडणे संभवते. त्यामुळे मन अशांत राहील. या राशीच्या अष्टम स्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून जलभयकारक आणि विषभयकारक आहे. त्यामुळे जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच या स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता भडकून काही मंडळींना उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. विशेष करून मूळव्याधीसारखा आजार अधिक प्रमाणात त्रस्त करील. वीजभय असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. हाडमोड होण्याची शक्यता असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो उच्च बौध्दिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. नोकरीत बढती मिळेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात प्रगती होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील, धनलाभ होईल व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. शिवाय दररोज सकाळी स्नान करताना पुनर्वसू जन्मनक्षत्र असणारांनी " ओम अदितीये नमः:" मंत्राचा, पुष्य जन्मनक्षत्र असलेल्यांनी " ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा आणि आश्लेषा जन्मनक्षत्र असणारानी _ओम सर्पाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा श्रद्धेने जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. रवि -बुध - राहू हे अनुकुल असल्याने नोकरीत काही मंडळींना बढती, पगारवाढ, क्वचित कोणास उच्च पद, प्राप्त होणे संभवते. सुखसमाधान लाभेल. नवे मित्र मिळतील. आरोग्य उत्तम राहील. धनलाभ होईल. पण हा राहू धोकादायक असल्याने अधिकारपद असणारांनी अधिकाराचा दुरुपयोग करू नये. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. तसेच या राहूमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल, व त्यामुळे दु:ख, मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेला शुक्र ग्रह स्वतंत्र व्यवसाय असणारांना प्रतिकुल असून तो त्यांच्या व्यवसायात अडथळे, अडचणी, विलंब निर्माण करील. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले मंगळ व नेपच्यून हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखास प्रतिकुल असून त्यांच्यामुळे पतिपत्नीपैकी कोणाचे अनारोग्य, पतिपत्नीत होणारे वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करणारे आहेत. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या मकर या स्वराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे अनारोग्य, वाद, भांडणे, गैरसमजुती अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी केतु आणि वक्री गुरु असे दोन ग्रह आहेत. पैकी केतु हा गुरु या शुभ ग्रहाशी संबंधित असल्यामुळे वेदांत, गूढ अभ्यास, उपासना आदि गोष्टीना अनुकुल होईल. गुरु ग्रह या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस अनुकूल होईल; पण तो वक्री असल्याने अपेक्षा पूर्ण होण्याइतकी प्रगती होण्याची शक्यता दिसत नाही. प्रेमसंबंध असतील तर ते वाढतील. सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर गायत्री उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून “सूर्य गायत्रीमंत्रा”चा बारा वेळा जप करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः: “मंत्राचा, पूर्वा जन्मनक्षत्र असणारांनी “ ओम भगाय नमः:” मंत्राचा आणि उत्तरा जन्मनक्षत्र असणारानी “आर्यमे नमः:” मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अतिशय अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होणार आहे. थोरामोठयांच्या ओळखी होतील. धनलाभ होईल. प्रतिष्ठा लाभेल. मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. राहूमुळे काही मंडळींना अधिकार पद मिळेल तर काहींचा सन्मान होईल. भाग्यस्थानी स्वराशीत असलेल्या शुक्रामुळे काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी प्राप्त होईल. तसेच काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत असलेला हर्षल धोकादायक व अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. पैकी मंगळ अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे ताप येणे, अंगावर फोड येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे, अशा प्रकारचे आजार होणे संभवते. शिवाय

चोरी होणे, आर्थिक हानी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे अशा मनस्ताप देणाऱ्या घटना घडणेही संभवते. मंगळासह असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत असलेल्या शनीमुळे बुद्धी संशयी, स्वार्थी, अत्यंत व्यवहारी होणे संभवते. पण हा शनि चिकाटीचा गुण देईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असल्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. ज्यांना स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार करावयाचे असतील त्यांनी अशा व्यवहारात अडचणी, अडथळे येणार नाहीत याची काळजी घ्यावी. केतुमुळे कोणाशी पटणार नाही. मन चिंताग्रस्त राहील व हा केतू विषभयकारक असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना उत्तरा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम आर्यमे नमः:” मंत्राचा, हस्त जन्मनक्षत्र असणारांनी “ओम सूर्याय नमः:” मंत्राचा आणि चित्रा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम त्वष्टे नमः:” मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या मंडळींची मानसिक स्थिती अत्यंत भावनाशील झाली असावी, असे वाटते. परंतु हा नेपच्यून उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करण्यास अनुकुल होईल. तसेच गूढ अभ्यासातील प्रगतीसाठीही अनुकूल होईल. नेपच्यूनसोबत असलेला मंगळ वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल होईल; मात्र संततीविषयक समस्सया निर्माण झाल्यास मनस्तापदायक होण्याचीच शक्यता आहे. हा मंगळ प्रतिकुल असल्यामुळे या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत असलेल्या हर्षलमुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी स्वतः:च्या स्वामित्वाच्या वृषभ राशीत शुक्र असल्यामुळे कमी श्रमात भरपूर अर्थप्राप्ती होईल. तसेच जन्मकुंडलीत योग्य असेल तर या राशीच्या काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. पण या राशीच्या वृद्ध मंडळींना मात्र तो प्रतिकुल होईल. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेले रवि -बुध -राहू हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असून या राशीच्या नोकरदार मंडळींना अतिशय मनस्तापदायक होतील. नोकरीत कामाचा ताण, मानहानी, विरोध, भांडणे होणे संभवते. तसेच नियोजित कामात अडचणी, अडथळे येणे, विलंब होणे अशा घटना घडण्याची शक्यता दिसते. राहूमुळे अनारोग्य होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व नोकरीत मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या तृतीय स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून सोबत केतूही आहे. गुरु ग्रहामुळे काही मंडळींना प्रवासयोग येईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होणे संभवते. पण या गुरुमुळे भावंडांपैकी कोणाकडून तरी असह्य मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. केतूमुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण इतरांना तो मनस्तापदायक असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासना करावी. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो गृहसौख्यास हानिकारक होणेच संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती

देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे व रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" मंत्राचा, स्वाती जन्मनक्षत्र असणारांनी "ओम वायवे नमः:" मंत्राचा आणि विशाखा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम इंद्राग्नये नमः" मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या अष्टम स्थानी रवि -बुध राहू असे तीन ग्रह आहेत. राहू-बुध अनुकुल व लाभदायक असून रवि ग्रह मात्र पूर्णपणे प्रतिकुल आहे. त्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत या महिन्याचा संपूर्ण काळ मनस्तापदायक जाण्याची शक्यता दिसते. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. इच्छा अपूर्ण राहतील. संततीविषयक चिंता त्रस्त करील. पण बुध ग्रहामुळे काही मनोनुकुल घटना घडतील. सुखसमाधान लाभेल. राहूमुळे जन्मकुंडलीत योग असेल तर काही मंडळींना अचानक धनलाभ तर काहींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. जीवनसाथी/संगिनी कलाकार असेल तर अधिकच आनंद होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी हर्षल असून काही मंडळींना अनारोग्याचा त्रास होणे संभवते. मुदतीचा ताप येणे, डोकेदुखीचा आजार होणे, मनस्थिती चंचल होणे संभवते. हा हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास पूरक होईल. पण अति खोल विचार करू नका. मेंदूला विश्रांती द्या. नपेक्षा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले मंगळ व नेपच्यून हे दोन्ही ग्रह कौटुंबिक सुखास व गृहसौख्यास प्रतिकुल असून गैरसमज वाद, भांडणे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी स्वराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा नवे कार्यक्षेत्र मिळेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीचह्या धनस्थानी स्वराशीत वक्री गुरु व केतू असे दोन ग्रह आहेत. पैकी केतुमुळे आर्थिक चिंता त्रस्त करील. पण गुरु ग्रह अनुकुल असल्याने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. अर्थलाभ होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी " ओम इंद्राग्नये नमः " मंत्राचा, अनुराधा जन्मनक्षत्र असणारांनी " ओम मित्राय नमः " मंत्राचा आणि ज्येष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी " ओम इंद्राय नमः:" मंत्राचा १०८ वेळा श्रद्धेने जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत वक्री गुरु व केतू असे दोन ग्रह आहेत. हे दोन्ही ग्रह शारीरिक-मानसिक आरोग्यदायक होणार आहेत. सुखसमाधान देणारे आहेत. बौद्धिक व संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होतील. या राशीच्या धनस्थानी स्वराशीत शनि ग्रह असल्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. शिवाय आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून नेपच्यून ग्रह अध्यात्म आणि गूढ संशोधन कार्यास अनुकुल व यशदायक होईल. मनस्थिती भावनाशील बनेल. काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. मंगळ ग्रहही अनुकुल असून त्याच्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल. पण या मंगळामुळे

इजा होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो कलापोषक असून अंतर्ज्ञान देणारा आहे. तसेच तो उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी स्वराशीत शुक्र ग्रह असला तरी उच्च प्रकारचे कलागुण असूनही अपेक्षित प्रगती होण्याची व कलागुण प्रदर्शित करण्यास संधी मिळण्याची शक्यता दिसत नाही. शुद्ध प्रेमभावना नसेल तर प्रेमात सफलता येणार नाही. त्यामुळे नैराश्य येऊन काहीजण व्यसनाधीन होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी रवि -बुध -राहू असे तीन ग्रह आहेत. हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असून रविमुळे अनारोग्य होणे संभवते. काहींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. बुध ग्रहामुळे दु:ख, भांडणे यांचा त्रास होईल. राहूमुळे मनात कपटी विचार प्रबळ होतील. वाममार्गे धनाची अभिलाषा प्रबळ होईल. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर अधिक प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य, दु:ख, अपयश, भावनेच्या भरात मन भरकटत जाणे, संततिविषयक चिंता निर्माण होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. शिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" मंत्राचा, पूर्वाषाढा जन्मनक्षत्र असणारांनी " ओम उदकाय नमः:" मंत्राचा आणि उत्तराषाढा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या व्ययस्थानी स्वराशीत वक्री गुरु व केतू असून या केतूमुळे स्वभाव अतिशय चंचल व लहरी होणे संभवते. गुरु ग्रह अध्यात्म व समाजकार्य याची आवड असणारांना प्रगतिकारक होईल. पण तो कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. अपेक्षाभंग होईल. तसेच प्रवास करणारांच्या प्रवासात अडचणी निर्माण होतील. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या स्वराशीतील शनि ग्रहामुळे जीवनकार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे, पतिपत्नीपैकी एकास किंवा दोघांसही अनारोग्याचा त्रास होणे, प्रवासात मनस्ताप सहन करावा लागणे, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यामुळे नैराश्य येणे, अपेक्षाभंग होणे अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून या दोन्ही ग्रहांमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. शिवाय उष्णताविकारांनी अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत असलेल्या हर्षलमुळे कोणत्याही परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. वास्तुसुख लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या पंचम स्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना त्यांच्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून येथील रवि दशम स्थानास पूरक होईल व त्यामुळे कोणताही व्यापार व्यवसाय वा नोकरी असणारांना अनुकुल होईल. स्वराशीतील बुधामुळे कार्यसिद्धी होईल, धनप्राप्ती होईल व काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना उत्तराषाढा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम

श्रीविश्वेदेवाय नमः " मंत्राचा, श्रवण जन्मनक्षत्र असणारांनी "ओम विष्णवे नमः " मंत्राचा आणि धनिष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी " ओम वसवे नमः" मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ व केतु असे दोन ग्रह असून केतुमुळे वाहनधोका आहे. जपा. मंगळामुळे स्वभाव हट्टी , संतापी, जिददी , मानापमान फार असणारा, अकारण श्रम, दगदग सहन करावी लागणारा असा घडला असावा असे वाटते. अशा परिस्थितीत मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. शिवाय तो अनारोग्यकारखी आहे. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल असून तो उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे ऐषाराम सुखसमाधान लाभेल. शेतीवाडी असणारांना तो खूप लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत रवि -बुध -राहू असे तीन ग्रह असून रवि ग्रहामुळे अनारोग्य होणे, नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागणे, अपमान होणे , प्रिय जनांपासून दूरत्व येणे, संततिसुखात बाधा येणे, अशा घटना घडणे संभवते. रवि ग्रहाच्या छायेत बुध असल्याने बुद्धीचा प्रभाव दिसणार नाही. राहूमुळेही संततिसुखात बाधा येईल. या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. परंतु हा राहू दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर परिस्थितीत बदल होईल. मनशांती लाभेल. हितशत्रू पराभूत होतील. तसेच तो दशम स्थानास पूरक होईल. या राशीच्या लाभस्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु आणि केतू असे दोन ग्रह आहेत. हे दोन्ही ग्रह अनुकुल असून त्यांच्यामुळे इच्छा आकांक्षा काही प्रमाणात पूर्ण होतील. वाहनसुख मिळेल. विवाहेच्छूचे विवाह ठरतील. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. प्रवासयोग येईल. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो प्रतिकुल परिस्थिती निर्माण करील. अनारोग्य होणे, अपमान होणे, मनस्ताप सहन करावा लागणे संभवते. या काळात आर्थिक व्यवहार जपून करा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मनशांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः " मंत्राचा, शततारका जन्मनक्षत्र असणारांनी " ओम वरुणाय नमः " मंत्राचा आणि पूर्वाभाद्रपदा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम अजैक चरणाय नमः " मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अति अस्थिर, चंचल, लहरी अशी झाली असण्याची शक्यता वाटते. त्यामुळे अविचारी आचरण होत असले पाहिजे. अविचाराने खर्च होत असेल. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे, याची जाणीवही होत नसेल. या राशीच्या तृतीय स्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे या राशीच्या काही मंडळींना भूमिलाभ, काहींना धनलाभ तर काही मंडळींना मानाचे स्थान वा प्रतिष्ठा प्राप्त होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत रवि -राहू-बुध असे तीन ग्रह असून रवि-राहू मुळे कौटुंबिक त्रास, अनारोग्य, कार्य दिरंगाई, निराशा, दुःख सहन करावे लागण्याची शक्यता आहे. पण स्वराशीतील बुधामुळे गृहसौख्यात बाधा येणार नाही. मित्रसुख लाभेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर प्रिय जनापासून दूरत्व, अस्वस्थ मनस्थिती,

संततिसुखात बाधा, नोकरीत वरिष्ठांचा त्रास अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी धनु या स्वराशीत वक्री गुरु व केतू असे दोन ग्रह आहेत. येथील केतुमुळे या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तो विचार सोडून द्यावा व आहे ती नोकरीच मनापासून करावी. बोद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना येथील गुरु अनुकुल व लाभदायक होईल. नोकरीत वरिष्ठ कामाचे कौतुक करतील. काही भाग्यवंतांचा मानसन्मान होणेही शक्य आहे. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे अर्थलाभ होणार असला तरी संततीस त्रास होणे संभवते. त्यामुळे संततीविषयक चिंता त्रस्त करील. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह प्रतिकुलच होणार आहेत. मंगळामुळे वाद, भांडणे, चिंता, अस्वस्थ मनस्थिती, मानहानी होणे संभवते. नेपच्यूनमुळे मानसिक व्यग्रता व नैराश्य येईल. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी श्रद्धेने “ अजैकचरणाय नमः: “ मंत्राचा, उत्तराभाद्रपदा जन्मनक्षत्र असणारांनी “ अहिरबुधन्याय नमः:” मंत्राचा आणि रेवती जन्मनक्षत्र असणारांनी “ओम पूषाय नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====